
साहित्य प्रतिष्ठान
दुर्ग दुर्गट भारी

साहित्य प्रतिष्ठान



दुर्ग दुर्गट भारी

# पुस्तक पाचवे

# रायरेश्वर आणि केंजळगड

# अर्पणपत्रिका

शिवरायांच्या स्वराज्यस्थापनेच्या

शपथेची गोष्ट ऐकत गेलेल्या

त्या रम्य आणि निरागस बालपणांस –



# ॥ पुस्तक पाचवे ॥

# रायरेश्वर आणि केंजळगड



प्रथमावृत्ती: १ नोव्हेंबर २०११

अतिथी संपादक - ओंकार ओक

ही ई-पुस्तिका विनामूल्य वितरणासाठी असून कोणत्याही स्वरूपात हिची विक्री करण्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

©२०११

ई साहित्य प्रतिष्ठान
जी ११०२, ईटर्निटी
मॅरेथॉन चौक
ठाणे - ४००६०४

*या पुस्तिकेतील साहित्याचे व प्रकाशचित्रांचे हक्क त्या त्या साहित्यिकाकडे सुरक्षित आहेत*

या पुढील अंक विनामूल्य मिळण्यासाठी आपला ई मेल आय डी कळवा :

**durgabhari@gmail.com**

या पूर्वीची ई पुस्तके विनामूल्य मिळवण्यासाठी भेट द्या

**www.esahity.com**

# अनुक्रम


- आडवाटांचे देणे: नचिकेत जोशी
- प्रस्तावना
- रायरेश्वर
  - भौगोलिक स्थान व जाण्याचे मार्ग
  - इतिहासाचा मागोवा
  - गडाचा फेरफटका
- केंजळगड
  - भौगोलिक स्थान व जाण्याचे मार्ग
  - इतिहासाचा मागोवा
  - गडाचा फेरफटका
  - नकाशा
- देव देतो दोन! : आनंदयात्री
- ट्रेकर्ससाठी उपयुक्त माहिती
- ऋणनिर्देश







नमस्कार दोस्तहो!!

रोजच्या धावपळीच्या आयुष्यातून निवांतपणा शोधत डोंगरदऱ्या पालथ्या घालायला सुरुवात करून तुम्हाला अनेक वर्षं झाली असतील. अस्सल ट्रेकरची वर्णने वाचून त्यानुसार स्वत:ला त्यात बसवण्याचा प्रयत्नही करून झाला असेल. मनात आलं की पाठीवर (कायम भरून तयार असलेली) सॅक टाकून भटकणं आता सवयीचं झालं असेल. सगळं जग क्रिकेट मॅच किंवा लग्नसमारंभ अशा मोहमयी गोष्टींत अडकले होते, किंवा थिएटरमधल्या उबदार खुर्च्यांवर बसून थंडगार वातावरणात, अगदी जवळ बसून (कुणाच्या हा प्रश्न तुम्हाला पडला नसणार याची आम्हाला खात्री आहे) वेळ घालवत होते, तेव्हा आपण स्वत: मात्र काय केलं होतं ते आठवतंय ना?

उजाडण्याची वाट बघत रेल्वे प्लॅटफ़ॉर्मवर रात्र काढली होती, वाटेतल्या एखाद्या दगडावरच पाठ टेकवली होतो, सूर्योदय-सूर्यास्ताचे फोटो घ्यायला छाती फुटेपर्यंत कड्याच्या दिशेने धावला होतो, बाहेर पडणाऱ्या पावसाच्या आणि रातकिड्यांच्या किरकिऱ्या म्युझिकच्या साथीने गुहेत ट्रेकी गाण्यांची मैफल भरवली होती. अंधारात, पाऊस तोंडावर झेलत राजांचे मावळे असल्यागत नदी-नाले-चिखलगाळ तुडवला होता (आणि मुक्कामाला पोहोचलो तेव्हा पायातून बूट शेवटी ओढून काढावे लागले होते!)."घरी आराम करायचं सोडून इथे मरायला यायला कुणी सांगितलं होतं" हा प्रश्न जेव्हा जेव्हा पडला होता तेव्हा पुढच्याच वळणावर एखाद्या झऱ्याने, एखाद्या बुलबुल-ससाण्याच्या शर्यतीने, एखाद्या नाजूक फुलाने किंवा आकाशातल्या नक्षत्रांच्या सड्याने त्याचं उत्तर परस्पर देऊन टाकलं होतं.(पुढे पुढे मात्र हा प्रश्न कधी पडलाच नाही!) कुठल्याही ट्रेकमध्ये मिसळ-पाव खाल्ला नाही आणि एकदा तरी

निसर्गाच्या सान्निध्यात "दान" केलं नाही तर ट्रेक निष्फळ ठरतो, तसेच ट्रेकमध्ये नैसर्गिक पाणीसाठे सोडून इतरत्र आंघोळ करणे हे पाप असते या विचारांवर निष्ठा ठेऊन राजांच्या जयघोषात कधी तोरणा-राजगड, तर कधी रतनगड-हरिश्चंद्रगड, कधी पन्हाळगड-विशाळगड तर कधी खांडस-भीमाशंकर अशा वाऱ्या केल्या होत्या! (आणि फावल्या वेळात ट्रेकिंगने आम्हाला काय दिलं, किंवा मी ट्रेक का करतो अशा चर्चांमध्येही सहभागी झालो होतो!)

शहरातल्या रंगीबेरंगी दुनियेपेक्षा सह्याद्रीच्या सहवासातली रंगाची दुनिया अधिक मोहक आणि अस्सल आहे हे आपण केव्हाच स्वत:शी कबूल केलं आहे! आणि म्हणूनच एखादा चित्रपट पुन्हा पुन्हा बघावा तसं दर उन्हाळा-पावसाळा-हिवाळयात त्याच ओढीने आजही तेच किल्ले, तेच उतार, तेच बुरूज, तेच दरवाजे, त्याच कातळ-कपारी, त्याच अवघड पायवाटा आपण तुडवत असतो. अर्थात "सर्व प्रकारचे विरोध" (सूज्ञांस अधिक सांगणे नलगे!) मोडून काढून हे करावं लागतं हे खरंच! पण "हे कार्य" व्हावे ही तो श्रींचीच इच्छा!! कदाचित या ट्रेकिंगमुळेच आपण दैनंदिन जीवनातसुद्धा ट्रेकरच्या खाक्यानेच वागतो. कचरा इकडे-तिकडे टाकत नाही, पाणी जपून वापरतो, खिशात सदैव एक टॉर्च घेऊन फिरतो, कशाशीही काहीही तोंडी लावून खाऊ शकतो, कुठेही adjust करू शकतो, इतर पर्यटनस्थळांच्या ठिकाणी चाललेला थिल्लरपणा पाहून आपलं रक्त खवळतं इ. इ.

"दुर्ग दुर्गट भारी" या नव्या ई-पुस्तकांच्या मालिकेत आम्ही आपल्यासोबत करणार आहोत महाराष्ट्रातल्या परिचित-अपरिचित गडकोटांची ई-यात्रा! आपण नवखे असाल तर मार्गदर्शक म्हणून आम्ही आपल्या सोबत असू आणि अट्टल भटके असाल तर आपल्यासाठी ही जुन्या सदाबहार आठवणींची यात्रा असेल. एका पुस्तिकेत एक-दोन किल्ले, त्यांची ऐतिहासिक, भौगोलिक माहिती, वैशिष्ट्ये, प्रवासाचे तपशील इ सर्व माहितीने परिपूर्ण अशी ही मालिका असेल. दुर्गभ्रमंतीचं एक रेकनर म्हणूया हवंतर! :)

आपल्यासारख्या अट्टल भटक्यांच्या स्वागताला आडवाटाही सजवून सदैव तयार असणाऱ्या आपल्या लाडक्या सह्याद्रीमधल्या दुर्गभ्रमंतीला - चला, निघूया!

**- नचिकेत जोशी**

(संपादक, दुर्ग दुर्गट भारी)



# प्रस्तावना

## नमस्कार दोस्तहो!

रायरेश्वर…भोर तालुक्यातलं असं एक ठिकाण ज्याची नाळ इतिहासाशी सुद्धा जोडली गेली आहे आणि मावळातल्या नितांत सुंदर निसर्गाशीही. छत्रपती शिवरायांनी रायरेश्वरावर हिंदवी स्वराज्याची शपथ घेऊन सार्वभौमत्वाची मुहुर्तमेढ रोवली. रायरेश्वराच्या आसपासचा मुलुखही तसा इतिहासात मानाचं स्थान प्राप्त केलेला. पायथ्याच्या कारी गावातील कान्होजी आणि बाजी सर्जेराव जेधे यांनी आपल्या तलवारीचं पाणी शत्रूला अनेकदा पाजलं. हिरडस मावळयातल्याच बाजीप्रभूंनी आपल्या शौर्यानं गजापूरची खिंड अत्यंत बिकट परिस्थीतीत लढवली आणि ती सर्वार्थानं पावन केली. रायरेश्वर पुण्यापासून हाकेच्या अंतरावर जरी असलं तरी ‘टिपीकल’ शहरी गोंगाटापासून कितीतरी दूर आहे. इथं यावं ते सरत्या वर्षाकाळी. हिरवाईनं बहरून आलेलं रायरेश्वराचं पठार आणि त्यावरच्या मनमोहक रानफुलांची निसर्गाने मुक्तहस्ते केलेली उधळण डोळे भरून पहावी. वाटेवरच्या शुभ्र प्रपातांच्या जलधारा अंगावर घ्याव्यात आणि रायरेश्वर - केंजळचा आसमंत प्रत्येक वेळी नव्याने अनुभवावा. निसर्गाच्या या वरदहस्तामुळं ट्रेकर्सप्रमाणं हळूहळू इथं फुलांचा अभ्यास करणा-या अभ्यासकांचीही गर्दी वाढू लागली आहे. शेजारचा केंजळगडही त्याच्या पाय-यांच्या मार्गामुळे आणि त्यावरून दिसणा-या निरा खो-याच्या तसंच धोम धरण परिसराच्या अप्रतिम देखाव्यामुळे हळूहळू भटक्यांच्या नकाशावर स्थान मिळवत आहे. रायरेश्वराचं पठार कोळेश्वर,नाखिंद,महावळेश्वर या अजस्त्र पर्वतांनी वेढलेलं आहे. पावसाळयात हा सगळाच प्रदेश हिरवागार होतो आणि ट्रेकर्ससाठी पर्वणी ठरतो. तेव्हा नेहमीच्या ठरलेल्या ठिकाणांना आज सुट्टी द्या आणि चला एका ‘परफेक्ट’ भटकंतीला….



**- ओंकार ओक**

**(अतिथी संपादक)**

# रायरेश्वर

## भौगोलिक स्थान व जाण्याचे मार्ग



**अक्षांश-रेखांश -** १८⁰ ३' उत्तर आणि ७३⁰ ४४' पूर्व,

**उंची -** ४५८९ फूट (अंदाजे १४०० मी)

**दुर्गप्रकार –** पठारी प्रदेश

**श्रेणी –** मध्यम

**शेजारीपाजारी -** उत्तर ः वातावरण स्वच्छ असल्यास लोहगड,विसापूर,तुंग,तिकोना.

दक्षिण ः महाबळेश्वर,मकरंदगड,प्रतापगड.

उत्तर ः निरा नदीचं खोरं.

पूर्व ः पांडवगड व धोम धरण.

**जाण्याचे मार्ग**

पुणे जिल्ह्यातील भोर या तालुक्याच्या गावाजवळ हे गिरिस्थान वसलं आहे..जितकं अनगड तितकचं रमणीयॐ सरत्या पावसाळयात आवर्जून भेट देण्यासारखं ट्रेकर्सच्या हक्काचं ठिकाण.त्यात पुन्हा रोहिडा,केंजळगड,कमळगड यांसारखे किल्लेही या ट्रेकमध्ये समाविष्ट करता येत असल्याने भटक्यांची गर्दी रायरेश्वरावर बारा महिने असते.रायरेश्वरला जाण्याचे अनेक मार्ग आहेत.त्यातला सर्वात सोयीचा मार्ग म्हणजे भोर हे तालुक्याचं गाव गाठून तिथून आंबवडे - टिटेघर मार्गे कोर्ले गाव गाठायचं.याला गायद-याची वाट असं नाव आहे.दुसरी वाट म्हणजे भोर - महाड रस्त्यावरील दापकेघर गावातून धानिवली मार्गे रायरेश्वरावर जाणारी वाघद-याची वाट.तिसरी वाट कारी या बाजी जेध्यांच्या इतिहासप्रसिद्ध गावातून जाणारी सांबरद-याची वाट तर चवथी केंजळगडाहून डोंगरवाटेने रायरेश्वरला जोडली गेलेली श्वानद-याची अथवा सूणद-याची वाट.नवख्या ट्रेकर्सला कोर्ले गावामार्गे जाणारी वाट ही सोयीची आहे.कोरल्याहून निघालं की मोठी गाडी जाऊ शकेल असा कच्चा रस्ता रायरेश्वर पर्यंत गेलेला दिसतो.लोहगड किंवा कोथळीगडाचा 'फिल' देणा-या या वाटेवर धवधव्यांची रांग आहे.सप्टेंबर मध्ये या संपूर्ण मार्गावर तसंच रायरेश्वरच्या मुख्य पठारावर रानफुलांचा अक्षरशः गालिचा अंथरलेला दिसतो.सुमारे दीड तासात आपण रायरेश्वरच्या शेवटच्या

टप्प्यात पोहोचतो.अलिकडेच इथं रेलिंग आणि एका अवघड ठिकाणी लोखंडी जिना बसवलेला आहे.अशा रीतीने ऊन-पावसाचा खेळ अनुभवत आणि धबधब्यांची मजा लुटत हा चढाईचा प्रवास रायरेश्वरच्या मुख्य पठारावर येऊन थांबतो.

## मागोवा इतिहासाचा

रायरेश्वरचा उपयोग हा लष्करी कामासाठी केला गेल्याचे उल्लेख मिळत नाहीत.रायरेश्वरचे देवस्थान हे अत्यंत प्राचीन असले पाहिजे असा तर्क त्याच्या अंतर्गत रचनेवरून लावता येतो.सध्या या मंदिराचा जिर्णोद्धार झाल्याने त्याची मूळ बांधणी लक्षात येत नाही.शिवाजीमहाराजांनी हिंदवी स्वराज्याची शपथ इथं घेतली असे मानले जाते.हिरडस मावळातील या शिवालयाचा समावेश पंतसचिवांच्या भोर संस्थानात होता.

## गडाचा फेरफटका

रायरेश्वरचे मुख्य आकर्षण म्हणजे त्यावरील प्राचीन शिवालय.रायरेश्वरवर राहणा-या जंगम लोकांकडून शंकराची पूजाअर्चा केली जाते.आधी कल्पना देऊन ठेवल्यास या ग्रामस्थांकडे जेवणाचीही सोय होते.देवस्थानाच्या सभामंडपातून आतमध्ये आल्यावर मुख्य गाभा-यात प्रवेश होतो.इथं शिवपिंड व नंदी आहे.बाकी कोणत्याही देवतांच्या मूर्ती इथं नाहीत.साधी पण आकर्षक रचना हे रायरेश्वरचे मुख्य वैशिष्टय.बाकी इथं पाहण्यासारखं काही नाही.पण सुंदर आणि मोहक रंगसंगतीच्या फुलांनी बहरलेलं रायरेश्वरचं पठार म्हणजे ट्रेकर्ससाठी नंदनवनच ॐ वेळ असेल तर सुमारे एक सव्वा तासाची पायपीट करून शेजारच्या केंजळगडावरही जाता येतं.किंवा कोळेश्वराच्या पठारामार्गे कमळगड गाठता येतो.तीन चार दिवस हाताशी असतील तर रोहिडा-रायरेश्वर-केंजळगड-कोळेश्वर-कमळगड-महाबळेश्वर असा जंगी ट्रेकही खिशात घालता येतो.

# केंजळगड

## भौगोलिक स्थान व जाण्याचे मार्ग

केंजळगड हा वाईच्या ईशान्येस सुमारे १८ कि.मी अंतरावर शंभू महादेव या डोंगररांगेतील एका डोंगरावर बांधण्यात आला आहे. याची समुद्रसपाटीपासूनची उंची असून किल्ल्याच्या डोंगरावरचा मुख्य सुळका हे त्याचे आकर्षण आहे.



**अक्षांश -** रेखांश - १८'०१" अक्षांश , ७३'४४" रेखांश

**उंची -** ४२७० फूट (अंदाजे १३०२ मी.)

**दुर्गप्रकार -** डोंगरी किल्ला

**श्रेणी -** मध्यम

**गडाची इतर नावे -** केळंजा, मनमोहनगड

**शेजारीपाजारी -** पूर्व : पांडवगड व धोम धरण

उत्तर : निरा खोरे

दक्षिण : कोळेश्वर,कमळगड व महाबळेश्वर

### जाण्याचे मार्ग

केंजळगडावर जाण्यासाठी भोरहून आंबवडे - टिटेघर मार्गे कोरले गाव गाठावे. कोरल्यासाठी भोरहून खासगी वाहने व एस.टी.ची सोय आहे. रायरेश्वर व केंजळगडचा पायथा कोरले हेच गाव असून गावातूनच किल्ल्याची चढण सुरू होते. रोहिडा किल्ला बघून डोंगररांगेने अथवा नाझरे - आंबवडे मार्गे कोरले गाव गाठता येते.

## मागोवा इतिहासाचा


समकालीन कागदपत्रे व विश्वसनीय साधनांनुसार हा किल्ला पूर्वी निजामशाही मध्ये होता. निजामशाही बरखास्त केल्यानंतर मुघल व आदिलशहा यांच्यात झालेल्या तहानुसार केंजळगडाचा समावेश आदिलशाहीत झाला. शिवाजीमहाराजांनी केंजळगड कसा जिंकला याची हकीकत रंजक आहे. दि. ८ एप्रिल १६७४ रोजी शिवाजीमहाराजांचा मुक्काम चिपळूण येथे होता. प्रतापराव गुजर नेसरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्याने हंसाजी मोहिते यांना हंबीरराव हा किताब बहाल करून त्यांची सेनापतीपदी निवड करण्यात आली.

वाई प्रांतातल्या या अभेद्य दुर्गाकडे शिवाजीमहारांजांचं लक्ष गेलं आणि त्यांनी हंबीररावांना किल्ला ताब्यात घेण्याची आज्ञा केली. मराठयांनी किल्ल्यावर एकच हल्ला चढवला. तुंबळ युद्ध सुरू झालं. पण किल्ल्यावरचा मुख्य अधिकारी गंगाजी विश्वासराव किरदत हा पूर्णपणे सावध होता. त्याने कडवा प्रतिकार करण्यास सुरूवात केली. पण लढता लढता गंगाजी धारातीर्थी पडला. मराठयांनी किल्ला ताब्यात घेऊन त्यावर मराठी निशाण फडकवलं. तो दिवस होता शके १५९६ आनंदनाम संवत्सर चैत्र वद्य १४ म्हणजेच दिनांक २४ एप्रिल १६७४. गंगाजीच्या मृत्युनंतर त्याच्या मुलाने,सिदोजीने आदिलशहाला नोकरीचा अर्ज करून त्याची चाकरी स्वीकारली. पुढे उत्तर पेशवाई मध्ये केंजळगड नाना फडणीसाच्या ताब्यात होता. शेवटच्या इंग्रज - मराठे युद्धामध्ये जनरल प्रिझरल ने दि. २६ मार्च १८१८ रोजी केंजळगड जिंकून घेतला.

## गडाचा फेरफटका

कोरल्याहून केंजळगडाच्या मुख्य सोंडेवरून सुमारे दीड - दोन तासाची खडी चढण चढावी लागते. यानंतर आपण किल्ल्याच्या माचीवर दाखल होतो. किल्ल्यावर गडदेवता केळंजाई देवीचे देऊळ,हनुमान मंदिर व पाण्याची एक विहीर आहे. गडाचा एक टप्पा इथं संपतो. इथे सध्या एक वस्ती होऊ घातली आहे. माचीवरून केंजळगडाच्या माथ्यावर जाण्यासाठी कातळात खोदलेल्या रूंद पाय-यांवरून मार्गक्रमण करावे लागते. अर्ध्या - पाऊण तासात आपण इथं पोहोचतो. सुमारे शंभर पाय-या चढून आपण किल्ल्याच्या माथ्यावर प्रवेश करतो. पाय-यांच्या सुरूवातीस किल्ल्याच्या दरवाजाचे अवशेष दिसतात. यानंतर माथ्यावर एक पाण्याचे टाके आहे. किल्ल्यावरच्या इमारतींचे सध्या फक्त भग्नावशेष शिल्लक असून दारूकोठार मात्र सुस्थितीत आहे. किल्ल्यावर पिण्याच्या पाण्याची बरीच टाकी आहेत. किल्ल्यावर बांधकामासाठी आवश्यक असणा-या चुना मळण्याचं दगडी जातंही आढळतं. किल्ल्यावरून आजूबाजूचा मुलुख अत्यंत सुंदर दिसतो. सप्टेंबरच्या सुमारास आल्यास हिरवागार दिलखुलास नजारा तुम्हाला पहायला मिळेल. केंजळगडावरून डोंगरमाथ्यामार्गे सोप्या वाटेने रायरेश्वरला सुमारे दोन तासात जाता येतं.

# नकाशा



उ
कृष्णा नदी
संगम
वाळकी नदी
खावली गाव
पडझड झालेला बुरूज
बुरूज
बुरूज
अवशेष
टाके
चुन्याचा घाणा
रायरेश्वर
TreKshitiZ.com
तळे
देवीची मुर्ती
दरवाज्याचे अवशेष
पायऱ्या
कोठार (भिमाचे मंदिर)
गुहा
टाके
चुन्याचा घाणा
प्रवेश
केंजळ

## देव देतो दोन!

एखादी गोष्ट नेहमी डोळयासमोर असावी, पण आपल्या वाट्याला न यावी, तसं काहीसं केंजळगडाच्या बाबतीत होत होतं. एका वर्षापूर्वी जेव्हा रायरेश्वराला पहिल्यांदा गेलो, तेव्हा कोर्ले गावाच्या डाव्या अंगाला दरीला लागून उभ्या असणाऱ्या केंजळगडाशी पहिल्यांदा नजरभेट झाली होती. रायरेश्वरावर दगडू जंगमाकडून केंजळगडाच्या वाटेबद्दल जुजबी माहिती मिळाली होती. त्या दिवशी जवळजवळ दिवसभर केंजळगड डोळयासमोर होता, पण जायला जमलं नव्हतं. त्यानंतर मागच्या वर्षभरात पांडवगड, कमळगडला जाताना जुना परंतु न भेटलेला दोस्त असावा तसा केंजळगड लांबूनच दिसत होता, पण जाणं काही होत नव्हतं. अखेर, यंदा सर्व 'कामगारांच्या' हक्काच्या दिवशी- १ मे ची सुटी धरून केंजळगडाकडे प्रस्थान ठेवले.

३० एप्रिलला, वेळ आणि वाहने यांची आयत्या वेळेपर्यंत ठरवाठरवी करून शेवटी आम्ही ९ जण पाच गाड्यांवर रात्री दहा वाजता निघालो. भारतीय प्रमाणवेळेनुसार निघायला (फक्त) २ तास उशीर झाला होता. भोर पर्यंत सुनसान रस्त्यावरून गाडी चालवण्याचा मनमुराद आनंद घेत भोरमध्ये पोचलो, तेव्हा रात्रीचे साडेअकरा झाले होते. तेवढ्यात सर्वांना चहा नामक 'उत्तेजक पेय' पिण्याची तल्लफ आली! आणि ती एवढी जोरदार होती की, अगदी आईस्क्रीमच्या दुकानातही चहाची चौकशी करून आलो!! तेव्हा त्या आईस्क्रीमवाल्याचा झालेला चेहरा पाहण्यासारखा होता! शेवटी समस्त उपहारगृहे निद्राधीन असल्याने आम्ही मोर्चा नाईलाजाने वरंधा मार्गावरच्या आंबवडे गावाकडे वळवला. इथून कोर्ले गावाचा फाटा आहे.

एका चौकोनाची जर रायरेश्वर ही एक बाजू असेल, तर, केंजळगड ही लगतची दुसरी बाजू आहे. (क्षेत्रफळ माहित नाही :-) ) दोन्ही डोंगर एकाच धारेने जोडले गेले आहेत. फक्त रायरेश्वर पुणे जिल्ह्यात (भोर तालुका) आहे, आणि केंजळगड सातारा जिल्ह्यात (वाई तालुका) आहे!

यावेळी फक्त केंजळगड हे एकच ठिकाण ठरवलेलं असल्यामुळे कोर्ले गावात गाड्या लावून रायरेश्वराच्याच वाटेने चढून केंजळगडाच्या माचीवरच्या वस्तीजवळ पथाऱ्या टाकायच्या असा बेत होता. बालेकिल्ला चढण्याचा कार्यक्रम दुसऱ्या दिवशी रामप्रहरी ठेवला होता. हा बेत रायरेश्वराच्या वाटेने चढण्यापर्यंत पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार सुरळीत पार पडला. आंबवडे ते कोर्ले हा अतिशय खराब रस्ता पार करून कोर्लेमध्ये पोचलो. सुदैवाने गावात दोन तरूण भेटले. त्यांच्या घराजवळ गाड्या लावल्या आणि हेल्मेटही त्यांच्याच घरात ठेवले. रात्री १ वाजता चढायला सुरूवात केली तेव्हा रायरेश्वर आणि केंजळगड अंधारात नाहीसे झाले होते आणि ही मोहीम पाहायला आकाशात फक्त चांदण्या जमल्या होत्या. कृष्णपक्षातली दशमी असल्यामुळे चंद्रराव आमची मोहीम फत्ते होण्याच्या सुमारास हजर राहणार होते!

रायरेश्वराची वाट अत्यंत सोपी आहे. (अवघड भाग आंबवडे ते कोर्ले ह्या खराब रस्त्याने गाडी चालवणे हाच आहे!) निम्म्यापेक्षा जास्त चढून गेलं की, एके ठिकाणी ह्या वाटा वेगळ्या होतात. एक डावीकडे केंजळगडाच्या माचीकडे जाते, आणि एक "यू टर्न" मारून रायरेश्वराकडे जाते. आमची ही वाट चुकली आणि आम्ही थेट रायरेश्वराच्या शिडीजवळच्या सपाटीवर पोचलो. तिथेच मुक्काम करण्यापेक्षा सरळ रायरेश्वराच्या मंदिरात मुक्कामाला जावे, त्यामुळे एकाऐवजी उद्या दोन्ही किल्ले होतील असे ठरवले आणि त्यानुसार शिडी चढू लागलो. मागे सहज वळून पाहिले, तर किल्ले रोहिड्याच्या (विचित्रगड) मागून उगवलेली तांबूस चंद्रकोर दृष्टीस पडली. भोरहून आंबवडेला येताना वाटेत डाव्या हाताला रोहिडा किल्ला दर्शन देतो. आसमंतातली शांतता अनुभवत आणि वाट शोधत रायरेश्वराच्या ऐतिहासिक मंदिरात पोचलो, तेव्हा पहाटेचे साडेतीन झाले होते. विशेष गोष्ट ही होती, की संपूर्ण चढणीत एकदाही रस्ता चुकलो नाही! (केंजळगडाची वाट चुकली हा अपवाद सोडून!)

सकाळी पाच वाजता उठलो, तर ऊन चढायच्या आत केंजळगड उतरता येईल' असा (निष्फळ) निष्कर्ष काढून सर्वांनी मंदिराबाहेरच्या चौथऱ्यावर पथाऱ्या टाकल्या. सकाळी सहा वाजता उठल्यावर शंकर जंगम यांच्याकडे चहा घेतला, दगडूचीही भेट झाली. तो आदल्या रात्री खावली गावात लग्नाला गेल्याचे कळले होते, नाहीतर सकाळच्या नाष्ट्याचीही सोय झाली

असती. त्यांचा निरोप घेऊन केंजळगडाकडे निघालो. रायरेश्वर ते केंजळगड ही वाट अगदी सोपी आहे. डोंगराच्या धारेवरून चालत गेलं की आपण गडाच्या माचीवर पोहोचतो. हा किल्ला थोडा पुरंदरसारखा आहे. म्हणजे खाली माची आणि वर तसाच बालेकिल्ला. माचीवरच्या वस्तीपर्यंत पोहोचण्यासाठी सोपी वाट आहे. आणि आता तर, दोन ट्रक एकावेळी जाऊ-येऊ शकतील एवढा रस्ता बनवण्याचं काम चालू आहे. हा रस्ता केंजळगडाला वळसा घालून पलीकडे कमळगडाकडे जाणार असल्याचं कळलं. डेक्कन ओडिसी सारखं एकाच वाटेवर रायरेश्वर, केंजळ, कमळगड दर्शन असा काही बेत असावा!

अर्ध्या तासात माचीवरच्या केंजळवाडीला पोहोचलो, आणि रानातून केंजळगडाच्या शिखराकडे चालायला सुरुवात केली. ही वाट जरा दमवणारी आणि बऱ्यापैकी चढणीची आहे. मे महिना असल्यामुळे रानमेवा झाडाझाडावर दिसत होता. कैऱ्या, थोडी कच्ची करवंदे यांचा भरपूर आस्वाद घेत अर्ध्या तासात वर पोहोचलो. शेवटच्या टप्प्यात एकाच कातळात कोरलेल्या ऐसपैस पायऱ्या आवर्जून पाहण्यासारख्या आहेत.

याही गडावर पाहायला काहीच नाही. अगदी मंदिराचं बांधकाम ही नाही. फक्त एक साठवणीची खोली वाटावी असं एक दगडी बांधकाम आहे. गडाची देवी उघड्यावर स्थानापन्न झाली आहे. तिथेच एक मारूतीरायही आहेत. एक प्रचंड मोठा जात्याचा वाटावा असा दगड उभा करून ठेवलेला सापडला. पण नुसत्या ऐतिहासिक पडक्या बांधकामापलीकडचा निसर्ग इथे भरपूर आहे. सुदैवाने मळभ असल्यामुळे उन्हाचा फारसा त्रास होत नव्हता. केंजळगडावरून वाई-भोर प्रदेशाचा तोच चिरपरिचित आसमंत दिसतो. रायरेश्वर, रोहिडा, कमळगड, नवरा-नवरीचे सुळके, वाळकी नदी, धोम धरण हे जुने ओळखीचे दोस्त्स वेगळया angle ने दिसले- नव्याने ओळख व्हावी तसे!

परतताना, ज्या वाटेने रात्री चढलो त्या रायरेश्वराच्या लांब-रूंद रस्त्याकडे न जाता केंजळवाडीतून पायवाटेने दरी उतरून पुन्हा कैऱ्या तोडत थेट कोर्ले गावात उतरलो. एखाद्या ट्रेक किंवा भटकंतीमध्ये निसर्गही हा असा सामील होऊन आणखी धमाल आणतो. ही वाटही

सोपी आहे. रात्री आकाशात पुरेसा प्रकाश नसल्यामुळे चुकायची risk नको, म्हणून या वाटेने आलो नाही, एवढंच! मग नेहमीप्रमाणे कोर्ले ते भोर, भोर ते हायवे गाडी चालवत, आणि हायवेवर कुलकर्ण्यांच्या उपहारगृहात निवांत पाहुणचाराचा आस्वाद घेत चार वाजता पुण्यात पोहोचलो.

अगदी ध्यानीमनी नसताना आमच्यापैकी काहीजणांचे या ट्रेकमध्ये रायरेश्वर आणि केंजळ असे एकाऐवजी दोन किल्ले झाले. वाट न चुकता झालेला हा पहिलाच ट्रेक असावा! पण तरीही यावेळी काहीच 'चुकल्यासारखं' वाटलं नाही! केंजळगड नावाच्या, खूप पूर्वीच मैत्री झालेल्या, पण भेटीचा योग न आलेल्या जुन्या आणि अजाणता दुर्लक्षित मित्राला भेटल्याचा आनंद कदाचित त्यापेक्षा अधिक वाटला असेल...

**- आनंदयात्री**



## ट्रेकसाठी उपयुक्त टिप्स: (अर्थात knowledge Transfer )

ट्रेक म्हटलं की उमेदीच्या पहिल्या काही वर्षांतला बराचसा वेळ सॅक भरण्यातच जातो. मला आठवतंय, माझ्या एका मित्राने एका ट्रेकला चक्क बादली आणली होती! खायला, चघळायला काय घ्यावं इथपासून कपडे, शूज कोणते घालावेत, आयत्यावेळेला उपयोगी पडतील अशी साधने कोणती, रानामधल्या वनस्पती-झाडांचे ट्रेकमधले उपयोगी गुणधर्म याबद्दल माहिती देणारा लेख आपण "दुर्ग दुर्गट भारी"मध्ये कायमस्वरूपी प्रकाशित करणार आहोत. पुढच्या वेळी निघताना याची एक प्रिंट घेऊन ठेवा की झालं!

सुरूवात करूया अगदी प्राथमिक टिप्स पासून, लवकरच आपण त्यांची सुधारित आवृत्ती प्रसिद्ध करणार आहोत –

१) ज्या किल्ल्यावर जाणार असाल तिथल्या वाटा, आजूबाजूच्या भूभागाची माहिती, चढायला लागणारा वेळ, राहण्याची सोय याची माहिती गोळा करा आणि घरच्यांनाही देऊन ठेवा. (127 hrs आठवतोय ना?)

२) प्रमाण नकाशे मिळालेच तर प्रिंट घेऊन जा. वाटा शोधण्यात त्यांचा खूप उपयोग होतो.

३) आपल्याला संपूर्ण वेळ उचलता येईल इतपतच सॅक भरा. आवश्यक त्याच गोष्टी सॅकमध्ये असाव्यात. उदा, ज्या पातेल्यात चहा करायचा त्यातच तांदूळ भिजवता येतील, अथवा एकच ताट झाकण म्हणूनही ठेवता येईल आणि तांदूळ धुवायला सुद्धा वापरता येईल.

४) कुठल्याही ट्रेकमध्ये टॉर्च, काडेपेटी, (मुक्कामी/नाईट ट्रेकमध्ये मेणबत्त्या) चाकू, (स्विस नाईफ असल्यास उत्तम), रद्दी पेपर, दोर, या गोष्टी घ्याच.

५) पायामध्ये ग्रिप असणारे शूज आवश्यक. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, चढण-उतरण शूजच्या नव्हे तर आपल्या पायांच्या बळावर करणार आहोत हे ध्यानात ठेवावे. त्यामुळे आत्मविश्वासाने पाऊल टाकणेही आवश्यक आहे. पण तरीही, निसरड्या, उभट भूभागावर शूज अतिरिक्त मदत देतात.

६) मुक्कामी ट्रेकमध्ये झोपण्यासाठी कॅरीमॅट उत्तम! वजनाला हलक्या, आटोपशीर असतात.

७) जेवण शिजवून खाण्याची वेळ आल्यास ट्रेकची मजा अजून वाढते. बाहेर पाऊस कोसळतोय, गुहेमध्ये चुलीचा सगळा धूर भरून राहिलाय, अंधारात, टॉर्चच्या प्रकाशात जेवण शिजतंय, त्याचा घमघमाट भूक चाळवतोय, पातेली कुणी घासायची यावर एका बाजूला वाटाघाटी सुरू आहेत.. अर्थात हल्ली रेडी टू कूक ची पॅकेट्स उपलब्ध असतात. नसल्यास पोहे, मॅगी, डाळ/पिठलं-भात. मुगाच्या डाळीची खिचडी हे पदार्थ भूकही भागवतात आणि कमी वेळात तयारही करता येतात. फावल्या वेळात चघळण्यासाठी खजूर, बिस्कीटे, चिक्की सुद्धा घेऊन ठेवा. जांभळे, करवंदांच्या मोसमातला ट्रेक असेल तर मग काय वर्णावी धम्माल महाराजा?

८) प्रत्येकाकडे किमान एक मोठी बाटली पाणी असणे आवश्यक. उन्हाळ्यात २ सुद्धा कधीकधी पुरेनाशा होतात. शिवाय बाटलीचा आपत्कालिन परिस्थितीत 'दाना'साठीही उपयोग होतो तो वेगळाच! :)

९) आपल्या आजारांबद्दल, ऍलर्जीबद्दल प्रत्येकाला माहिती असतेच. त्यानुषंगाने औषधे बरोबर ठेवा. एसटी लागणे, उन्हात फिरल्यास पित्त वाढणे, गवत-झाडीतून फिरल्यास रॅशेस उठणे इ त्रासांना नेहमीच टाळता येणं शक्य नसलं तरी उपाय करता येतात. सर्वासाधारणपणे एक फ़र्स्ट-एड बॉक्स एकाकडे असावा. त्यात ताप-सर्दी-पित्त यावरच्या गोळया, भाजल्यास-खरचटल्यास लावायचे मलम, कापूस, बॅंडेज, सोबतीला छोटी कात्री, दोरा, कोरडी फडकी इ साहित्य ठेवावे. ट्रेकमध्ये जबाबदारीने वागल्यास अपघात टाळता येतात हे खरेच. तरीही खबरदारी म्हणून ही औषधे!

१०) सर्वात शेवटी सर्वात महत्त्वाचे, ट्रेकमध्ये निसर्गाला, रानातल्या पशु-पक्ष्यांना, त्यांच्या अधिवासाला धक्का पोहोचेल असे कुठलेही कार्‍य करू नका. रात्री गोंधळ, गोंगाट, मद्यपान करून धिंगाणा करणे या गोष्टींसाठी ऐतिहासिक किल्ल्यांपेक्षा इतर उत्तम जागा या जगात भरपूर आहेत. दरीतून येणारा वाऱ्याचा आवाज, पक्ष्यांची मंजूळ किलबिल, उन्ह-पावसाचे खेळ, आणि यातलं काहीच नसेल तरी निखळ आणि नितळ शांतता यातलंही सौंदर्य अनुभवण्यासारखं असतं!

तसेच अशा ऐतिहासिक ठिकाणी स्वत:ची नावे लिहून येण्यासारखा नामर्दपणा दुसरा नाही. दस्तुरखुद्द शिवछत्रपतींचे नाव एकाही गडावर त्यांनी लिहिले अथवा लिहून घेतलेले नाहीये ही गोष्ट पुरेशी सूचक नाही का?

ट्रेकींगच्या आनंददायी अनुभवासाठी डोंगरभर शुभेच्छा!



## ऋणनिर्देश

१. नकाशा: www.trekkshitij.com

२. अक्षांश-रेखांश संदर्भ: wikipedia.org

# आवाहन

दोस्त !

हा नवीन उपक्रम कसा वाटला ते आम्हाला जरूर कळवा. तसेच आपल्या ट्रेकसाठी या महितीचा आपल्याला कसा उपयोग झाला तेही जाणून घ्यायला आम्हाला आवडेल. यात अजून काय आणि कशी सुधारणा करता येईल तेही सांगा. तुम्हाला अशी एखाद्या गडाची ओळख करून द्यायला आवडेल ?

या गडाबद्दल किंवा बृहन्‌महाराष्ट्रातल्या कोणत्याही गड किल्ल्याबाबत आपणाकडे माहिती फ़ोटो असल्यास कृपया आमच्याशी संपर्क साधा. पुस्तिकांची ही मालिका अधिकाधिक समृद्ध होण्यासाठी आपली मदत हवी आहे. तसेच गडकिल्ल्यांशी संबंधित काम करणारा आपला काही ग्रुप वगैरे असल्यास आम्हाला आपली माहिती कळवा. आपला किंवा आपल्या माहितीतल्या कुणाचा ब्लॉग, वेबसाईट यांचीही लिंक पाठवा. निवडक दर्जेदार लेखन आम्ही आपल्या नावासहित प्रसिद्ध करू.

आज इवलिसी दिसणारी ही पुस्तिका कालांतराने एक संदर्भ ग्रंथ बनावी अशी इच्छा आणि योजना आहे. आणि हे आपल्या मदतीशिवाय अशक्य आहे.

**आपल्या सर्व प्रकारच्या प्रतिसादांसाठी**

**लिहा**

durgabhari@gmail.com

**ई साहित्य प्रतिष्ठानच्या या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ई पुस्तकांसाठी**

**भेट द्या**

www.esahity.com



## ई साहित्य प्रतिष्ठान आजवरची प्रकाशने

ओथंब,
मोरया,
चार क्षण,
सईची वही
लोकल गोष्टी
प्रियेचे अभंग
तो आणि ती,
टल्लीची शाळा
अहम् ब्रह्मास्मि
ग्रेव्हयार्ड लिटरेचर
मकरंदच्या त्रिवेण्या
मीरा (मराठी अनुवाद)
सावळ्या मुलीची गाणी,
देशी दारूचे दुकान (3D),
मराठी कसे लिहावे(ई शाळा),
तो , मी आणि सिगारेट
ओथंब २

**दुर्ग दुर्गट भारी :**

किल्ले रायगड
पेबचा किल्ला
पन्हाळगड ते विशाळगड
दुर्ग कोंढाणा उर्फ सिंहगड

**नियतकालिके**

ई साप्ताहिक नेटाक्षरी
स्वरनेटाक्षरी अल्बम्स
ईस्टाप ( मराठी विनोद/ विडंबन)
बालनेटाक्षरी